# गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

(महाराष्ट्र शासन अधिसूचना क्रमांक २००७/(३२२/०७)विशि-४ महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम १९९४(१९९४ चा महा.३५) च्या कलम ३ च्या पोटकलम(२) अन्वये दिनांक २७ सप्टेंबर, २०११ रोजी स्थापित व महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ (सन २०१७ चा महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम क्रमांक ६) व्दारा संचालित राज्य विद्यापीठ)

**(आस्थापना विभाग)**

एम. आय. डी. सी. रोड, कॉम्पलेक्स, गडचिरोली जि. गडचिरोली ४४२६०५

email :- gug.registrar@gmail.com दुरध्वनी क्र. ०७१३२-२२३१०४ email:- gondwanaesst@gmail.com


जा.क्र. गो.वि./आस्था./६४५६/२०२१ दि. 03 /०८/२०२१

## परिपत्रक

विषय:- कोरोना विषाणू प्रसारावरील प्रतिबंधात्मक उपाययोजना करण्याबाबत.

संदर्भ:- १. विद्यापिठ परिपत्रक क्र. गों.वि./आस्था./६०१९/२०२१ दि. २८/०६/२०२१.

२. Government of Maharashtra, Public Health Department, Mantralaya, Mumbai Order No. Corona 2021/C.R.366/Arogya-5, Dated-02/08/2021.

३. जिल्हा दंडाधिकारी चंद्रपूर यांचे कार्यालयीन आदेश क्र.एमएजी/कार्या-८/टे-३/सांले/२०२१/ ८३१, दि. ०२/०८/२०२१.

४. जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण, गडचिरोली यांचे कार्यालयीन आदेश जिका/क्र.कार्या-३/ अका. आव्यक/कावि-११२०/२०२१, दि. ०३/०८/२०२१.

गोंडवाना विद्यापीठाशी संलग्नित सर्व महाविद्यालयांचे मा. प्राचार्य तसेच विद्यापीठ पदव्युत्तर शैक्षणिक विभागांचे सर्व विभागप्रमुख यांना सुचित करण्यात येते की, कोरोना विषाणूचा(कोव्हीड-१९) वाढता प्रादुर्भाव रोखण्यासाठी केंद्र शासन, राज्य शासन व जिल्हा स्थानिक प्रशासन यांचेव्दारे वेळोवेळी मार्गदर्शक सुचना व निर्देश निर्गमित करण्यात येत आहेत.

संदर्भ क्रमांक २ ते ४ च्या आदेशांन्वये महाराष्ट्र शासनाच्या आरोग्य विभागाकडून व चंद्रपूर आणि गडचिरोली जिल्हांच्या जिल्हा प्रशासनांकडून कोव्हीड-१९ साथरोगसंदर्भांत मार्गदर्शक सुचना व निर्देश निर्गमित करण्यात आले आहे. त्याअनुषंगाने संदर्भ क्रमांक २ ते ४ च्या आदेशांचे अवलोकन करुन गोंडवाना विद्यापीठाशी संलग्नित सर्व महाविद्यालयांचे मा. प्राचार्य तसेच विद्यापीठ पदव्युत्तर शैक्षणिक विभागांचे सर्व विभागप्रमुख यांनी कार्यवाही घेऊन अनुपालन अहवाल विद्यापीठ प्रशासनाकडे सादर करावा. उच्च व तंत्र शिक्षण विभाग यांचेकडून उपरोक्त विषयासंदर्भात मार्गदर्शक सुचना वा निर्देश निर्गमित झाल्यास त्यानुसार संबंधितांना अवगत केल्या जाईल, यांची नोंद घ्यावी.

संलग्न - संदर्भ क्र. २ ते ४ चे आदेश.

3/8/2021

(डॉ. अनिल चिताडे)
कुलसचिव(प्र.)
गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली.

**प्रतिलिपी माहितीस्तव व आवश्यक कार्यवाहीकरीता सादर:-**

१. मा. कुलगुरू महोदयांचे स्वीय सहाय्यक, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली.
२. मा. प्र-कुलगुरू, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली.
३. मा. प्राचार्य, सर्व संलग्नित गडचिरोली जिल्ह्यातील महाविद्यालये.
४. विद्यापीठातील सर्व पदव्युत्तर शैक्षणिक विभागाचे मा. सर्व विभागप्रमुख, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली.
५. सिस्टीम डाटाबेस ॲडमिनिस्ट्रेटर, संगणक विभाग, गोंडवना विद्यापीठ, गडचिरोली यांना सुचना करण्यात येत आहे की, सदर परिपत्रक विद्यापीठ संकेतस्थळावर प्रकाशीत करावे.

(डॉ. विजय सिलारे)
उपकुलसचिव(आस्थापना)
गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली.

Burade D:\GUG 2020\GUG\GUG 2020\PARIPATRAK 2019-20\Paripatrak2021

**GOVERNMENT OF MAHARASHTRA**
**Public Health Department**
**G. T. Hospital complex building,**
**10th floor Mantralaya, Mumbai- 400 001**
**No: Corona 2021/C.R.366/Arogya-5,**
**Dated: 02 Aug, 2021**

---

**Reference:**

1) The Epidemic Diseases Act, 1897.
2) The Disaster Management Act, 2005
3) Revenue and Forest, Disaster Management, Relief and Rehabilitation Department Order No. DMU 2020/ CR 92/Dis 1 dated 4th June, 2021 and 17th June, 2021 and 25th June, 2021.

**ORDER**

**Break the Chain – Modified Guidelines**

Whereas, in exercise of the powers, conferred under the Disaster Management Act 2005, the undersigned, in his capacity as Chairperson, State Executive Committee had issued the above mentioned Orders for containment of COVID 19 in the State

Whereas the State Government is satisfied that the State of Maharashtra is continued to be threatened with the spread of COVID-19 virus, and therefore it is imperative to continue emergency measures to prevent and contain the spread of virus, the Government in exercise of the powers conferred under Section 2 of the Epidemic Diseases Act, 1897, read with all other enabling provisions of The Disaster Management Act, 2005, finds, it is necessary to continue the enforcement of the current restrictions, along with certain additional restrictions, throughout the State to break the chain of transmission effectively.

Now, therefore, in exercise of the powers conferred under Section 2 of the Epidemic Diseases Act, 1897 and the powers, conferred under The Disaster Management Act, 2005, the undersigned, in his capacity as Chairperson, State Executive Committee, hereby imposes the following restrictions.

The restrictions that have been imposed through Break the Chain Orders dated 4th June, 2021 and 17th June, 2021 for level 3 be continued for the following districts –

1. Kolhapur
2. Sangli
3. Satara

4. Pune
5. Ratnagiri
6. Sindhudurg
7. Solapur
8. Ahmednagar
9. Beed
10. Raigad
11. Palghar

Amongst the above districts, considering the higher number of positive cases, higher emergence of fresh cases in the districts of Sindudurg, Satara and Ahmednagar, the respective disaster management authorities to impose effective restrictions in the said districts.

The decision regarding reducing the currently imposed restrictions in Mumbai, Mumbai Suburban and Thane districts to be taken by the Disaster Management Authorities of the said districts.

Apart from the above 14 districts, in all the other districts, the existing restrictions to the extent mentioned below are modified –

1) All essential and non-essential shops (including shopping malls) to remain open on all weekdays till 8 PM and till 3 PM on Saturday. All shops and malls except essential shops to remain closed on Sundays.
2) All Public Gardens and playgrounds can be kept open for the purpose of exercise, walking, jogging and cycling.
3) All Government and Private Offices can be operational with full capacity. Staggering of work hours to be done to avoid crowds while travelling.
4) The offices that can function through working from home should continue to do so.
5) All agricultural activity, Civil Works, Industrial activity, transport of goods can remain functional at full capacity.
6) Gymnasiums, Yoga Centers, Hair Cutting salons, beauty parlors, Spa's can remain open without use of air-conditioners and with 50% capacity till 8 PM on weekdays and till 3 PM on Saturdays. The said services will remain closed on Sundays.
7) All cinema theaters, drama theaters and multiplexes (independent and inside malls) to remain closed till further orders.
8) All places of worship in the State to remain closed till further orders.
9) The orders of the State Education department and the Higher and Technical Department will be applicable for schools and colleges.

10) All restaurants will remain open with 50% seating capacity till 4 PM on weekdays subject to adherence to all COVID 19 protocols. Parcel and Takeaway to be allowed as is allowed currently.

11) Restrictions on movement will be applicable from 9 PM to 5 AM.

12) In order to avoid crowding, restrictions imposed on birthday celebration, Political, Social and Cultural events, elections, election campaigning, rallies, protest marches to be continued.

13) All COVID 19 protocols - use of masks, social distancing etc. to be scrupulously followed across the State by all the citizens. Failure in stringent adherence to the same will result in action on the defaulters under relevant sections of the Disaster Management Act, 2005, the Epidemic Act and Section 1860 of the Indian Penal Code.

All other points not specifically mentioned in this order, will be in force in accordance with earlier order.

BY ORDER AND IN THE NAME OF THE GOVERNOR OF MAHARASHTRA

02/8/21

(SITARAM KUNTE)
CHIEF SECRETARY
GOVERNMENT OF MAHARASHTRA

महाराष्ट्र शासन

महसूल विभाग

# जिल्हा दंडाधिकारी चंद्रपूर यांचे कार्यालय

ई-मेल : chandrapur.rdc@ gmail.com
दुरध्वनी क्रमांक- 07172-250659

क्रमांक.एमएजी/कार्या-8/टे.3/सांले/2021/831

दिनांक : 02 ऑगस्ट, 2021

---

**वाचा** :- 1. साथरोग कायदा, 1897

2.आपत्ती व्यवस्थापन कायदा, 2005 चे कलम 30, 33, 34, 41 व कलम 51

3. फौजदारी प्रक्रिया संहिता, 1973

4. मा. मुख्य सचिव, महसूल व वन, आपत्ती व्यवस्थापन, मदत व पुनर्वसन विभाग, महाराष्ट्र शासन आदेश क्र. डीएमयु/ 2020/ सीआर,92/DisM-1 दि. 04/06/2021.

5. या कार्यालयाचे आदेश क्र.एमएजी/कार्या-8/टे.3/सांले/2021/571 दि. 04.06.2021.

6. मा. मुख्य सचिव, महसूल व वन, आपत्ती व्यवस्थापन, मदत व पुनर्वसन विभाग, महाराष्ट्र शासन आदेश क्र. डीएमयु/ 2020/ सीआर,92/DisM-1 दि. 25/06/2021.

7. या कार्यालयाचे आदेश क्र.एमएजी/कार्या-8/टे.3/सांले/2021/661 दि. 25.06.2021.

8. मा. मुख्य सचिव, महसूल व वन, आपत्ती व्यवस्थापन, मदत व पुनर्वसन विभाग, महाराष्ट्र शासन आदेश क्र. डीएमयु/ 2020/ सीआर,92/DisM-1 दि. 02/08/2021.

---

## : : आदेश : :

ज्याअर्थी, आपत्ती व्यवस्थापन कायदा 2005 मधील कलम 25 अन्वये जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाची स्थापना करण्यात आलेली आहे व त्यातील पोट कलम 2 (अ) नुसार जिल्हाधिकारी तथा जिल्हा दंडाधिकारी हे उक्त प्राधिकरणाचे पदसिध्द अध्यक्ष आहेत.

आणि ज्याअर्थी, राज्य शासनाने कोरोना विषाणूचा (कोव्हिड-19) प्रादुर्भाव रोखण्यासाठी राज्यात साथरोग कायदा 1897 दिनांक 13 मार्च 2020 पासून लागू करुन खंड 2, 3, व 4 मधील तरतुदींची अंमलबजावणीसाठी अधिसूचना निर्गमित केलेली आहे व त्याबाबतची नियमावली प्रसिध्द करुन जिल्हाधिकारी यांना सक्षम प्राधिकारी घोषीत केलेले आहे.

आणि ज्याअर्थी, मा. मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य यांनी संदर्भ क्र. 06 चे आदेशान्वये, महाराष्ट्र राज्यातील काही जिल्हयात कोरोना विषाणूचा 'डेल्टा प्लस' हा नविन विषाणूचा प्रकार आढळुन आल्याने सदर विषाणूचा प्रादुर्भाव नियंत्रणात ठेवण्याकरीता निर्बंध अधिक कडक करण्यासंदर्भात महाराष्ट्रातील कोणताही जिल्हा स्तर -3 च्या खाली असणार नाही असे नमुद करुन संदर्भ क्र. 04 चे आदेशातील स्तर-3 च्या तरतुदी लागू करण्यास आदेशीत केलेले असल्याने, संपूर्ण चंद्रपूर जिल्हयाचे कार्यक्षेत्रात संदर्भ क्र. 07 चे आदेशान्वये दि. 28.06.2021 पासुन स्तर-3 च्या तरतुदी लागू करण्यात आलेल्या आहेत.

आणि ज्याअर्थी, मा. मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांनी संदर्भ क्र. 08 चे आदेशान्वये, संदर्भ क्र. 06 चे आदेशातील सद्यस्थितीत स्तर-3 मधील लागू असलेल्या निर्बंधामध्ये काही प्रमाणात केलेल्या सुधारणा महाराष्ट्रातील 14 जिल्हे वगळता इतर जिल्हयामध्ये दि. 03.08.2021 रोजीपासुन लागू करण्याबाबत निर्देशीत केलेले आहे.

त्याअर्थी, **मी, अजय गुल्हाने, जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष, जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण, चंद्रपूर**, मा. मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांनी संदर्भ क्र. 08 चे आदेशान्वये, संदर्भ क्र. 06 चे आदेशातील सद्यस्थितीत स्तर-3 मधील लागू असलेल्या निर्बंधामध्ये खालील प्रमाणे केलेल्या सुधारणा चंद्रपूर जिल्हयाचे कार्यक्षेत्रात दि. 03.08.2021 रोजीपासुन लागू करीत आहे. सर्व संबंधीत प्रशासकीय विभाग प्रमुख यांनी सदर आदेशाची काटेकोरपणे अंमलबजावणी करावी.

1. सर्व अत्यावश्यक व बिगर अत्यावश्यक सेवेतील दुकाने/आस्थापना (शॉपींग मॉल्स सह) सोमवार ते शुक्रवार रात्री 08.00 वाजेपर्यंत तसेच शनिवारी दुपारी 03.00 वाजेपर्यंत सुरु राहतील. सर्व दुकाने व मॉल्स (अत्यावश्यक दुकाने वगळता) रविवारी संपुर्णत: बंद राहतील.
2. सर्व सार्वजनिक उद्याने व क्रिडांगणे व्यायाम, चालने, धावणे, सायकलींग करीता सुरु राहतील.
3. सर्व शासकीय व खाजगी कार्यालये संपुर्ण क्षमतेने सुरु राहतील.
4. ज्या कार्यालयामध्ये यापुर्वी Work From Home पध्दतीने कामकाज सुरु होते ते यानंतरही सुरु राहतील.
5. सर्व कृषी विषयक कामे, बांधकाम, औद्योगीक प्रक्रिया, मालवाहतूक पुर्ण क्षमतेने सुरु राहतील.
6. व्यायामशाळा, योगा केंद्र, केस कर्तनालय, ब्युटीपार्लर, स्पा इ. आस्थापना सोमवार ते शुक्रवार रात्री 08.00 वाजेपर्यंत तसेच शनिवार रोजी दुपारी 03.00 वाजेपर्यंत 50 टक्के क्षमतेसह वातानुकूलित यंत्राच्या वापराशिवाय सुरु ठेवता येतील. सदर सेवा (आस्थापना) रविवार रोजी संपुर्णत: बंद राहतील.
7. सर्व सिनेमागृहे, नाटयगृहे, मल्टीप्लेक्सेस (सिंगलस्क्रीन तसेच मॉल्स यामधील) पुढील आदेशापावेतो बंद राहतील.
8. जिल्हयातील सर्व धार्मीक/ प्रार्थनास्थळे पुढील आदेशापर्यंत बंद राहतील.
9. शाळा व महाविद्यालयाकरीता राज्य शिक्षण / उच्च व तंत्र शिक्षण विभागाचे आदेश लागू राहतील.
10. सर्व उपहारगृहे (Restaurants) सोमवार ते शुक्रवार दुपारी 04.00 वाजेपर्यंत 50 टक्के आसन क्षमतेने Dining साठी कोरोना वर्तणुकीविषयक नियमांचे पालन करुन सुरु राहतील. तथापी दुपारी 04.00 ते रात्री 09.00 वाजेपर्यंत केवळ पार्सल/Take Away/घरपोच सुविधा सुरु राहतील. तसेच शनिवार व रविवार Dining साठी पुर्णपणे बंद राहतील व केवळ पार्सल सुविधा/ Take Away/घरपोच सुविधा सुरु राहतील.
11. कोणत्याही नागरीकांस रात्री 09.00 ते सकाळी 05.00 या वेळेत बाहेर पडण्यास प्रतिबंध राहतील.
12. गर्दी टाळण्याकरीता वाढदिवस साजरा करणे, राजकीय/सामाजिक/सांस्कृतिक कार्यक्रम, निवडणुक, निवडणुक प्रचार, मेळावे, निषेध मोर्चे यावरील निर्बंध पुर्ववत राहतील.
13. सर्व कोरोना वर्तणुक विषयक नियम जसे की, मास्कचा वापर करणे, सामाजिक अंतर राखणे, वारंवार हात धुणे इत्यादी नियमांचे काटेकोरपणे पालन करणे प्रत्येक नागरीकांस बंधनकारक असेल.

सदर आदेशात नमुद नसलेल्या बाबी या संदर्भ क्र. 06 च्या आदेशानुसार कायम राहतील. तसेच सदर आदेशाची कोणतीही व्यक्ती, संस्था किंवा संघटना यांनी अंमलबजावणी करण्यास टाळाटाळ केल्यास अथवा विरोध दर्शविल्यास संबंधीताविरुध्द आपत्ती व्यवस्थापन कायदा, 2005 चे कलम 51 ते 60 व भारतीय दंड संहिता, 1860 चे कलम 188 तसेच साथरोग कायदा, 1897 अन्वये दंडनीय/कायदेशीर कार्यवाही संबंधीत पोलीस अधिकारी/कर्मचारी तसेच इतर संबंधित अधिकारी/ कर्मचारी यांनी करावी.

**सदर आदेश संपुर्ण चंद्रपूर जिल्हयाचे कार्यक्षेत्रात दिनांक 03.08.2021 पासुन पुढील आदेशापावेतो लागू राहील.**

**सदर आदेश माझे सही व शिक्क्यानिशी दि. 02.08.2021 रोजी निर्गमीत करण्यात येत आहे.**

(अजय गुल्हाने)

**जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष**

**जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण, चंद्रपूर**

**प्रतिलीपी :- माहितीस सविनय सादर.**

1. मा. मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई-032
2. मा. सचिव, आपत्ती व्यवस्थापन, मदत व पुनर्वसन, महसुल व वनविभाग, मंत्रालय, मुंबई 32
3. मा. विभागीय आयुक्त, नागपूर विभाग, नागपूर

**माहितीस तथा उचित कार्यवाहीस्तव.**

4. पोलीस अधिक्षक, चंद्रपूर
5. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, चंद्रपूर
6. आयुक्त, चंद्रपूर शहर महानगरपालीका, चंद्रपूर
7. जिल्हा माहिती अधिकारी, चंद्रपूर
8. उपविभागीय दंडाधिकारी (सर्व)
9. तहसिलदार तथा तालुका दंडाधिकारी (सर्व)
10. संवर्ग विकास अधिकारी, पंचायत समिती (सर्व)
11. मुख्याधिकारी, नगर परिषद/नगर पंचायत (सर्व)

**सदर आदेशास उपरोक्त अधिकारी यांनी प्रसिध्दी द्यावी.**

जिल्हाधिकारी कार्यालय चंद्रपूर

**जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष**
**जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण, चंद्रपूर**

**महाराष्ट्र शासन**
**जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण, गडचिरोली**
**तळमजला, जिल्हाधिकारी कार्यालय, गडचिरोली-४४२६०५**
▸ टोल फ्री क्रमांक :१०७७ ▸ हॉटलाईन क्र.: २००७ ▸ दूरध्वनी क्र.: ०७१३२-२२२०३०/३१/३५,
▸ मोबाईल क्र.: ९४२३९११०७७ ▸ E-mail id :dmcellgadchiroli@gmail.com

**जि.का./क्र.कार्या-३/अका.आव्यक/कावि-११२०/२०२१** **दिनांक :- ०३ ऑगष्ट, २०२१**

संदर्भ:

**१) साथरोग अधिनियम, १८९७.**
**२)आपत्ती व्यवस्थापन अधिनियम, २००५.**
**३) मा.प्रधान सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग, मंत्रालय मुंबई, अधिसुचना दि.१४.०३.२०२०**
**४) भारत सरकार, गृह विभाग, यांचे आदेश क्र. ४०-३/२०२०-DM-१(A), दिनांक २४.०३.२०२०**
**५) महसूल व वन, आपत्ती व्यवस्थापन, मदत व पुनर्वसन विभाग आदेश क्रमांक. डीएमयु-२०२०/ सी.आर.९२/ डीएमयु-१**, दिनांक २ मे, २०२०, ३ मे, २०२०, ५ मे, २०२०, ११ मे, २०२०, १५ मे, २०२०, १७ मे, २०२०, १९ मे, २०२०, २१ मे, २०२०, ३१ मे, २०२०, ४ जून, २०२०, २५ जून, २०२०, २९ जून, २०२०, ६ जुलै, २०२०, ७ जुलै, २०२०, २९ जुलै,२०२०, ४ ऑगस्ट.२०२०, १९ ऑगस्ट,२०२०, ३१ ऑगस्ट, २०२०, ३० सप्टेंबर, २०२० व १४ ऑक्टोबर, २०२०, २३ ऑक्टोबर, २०२०, २९ ऑक्टोबर, २०२०, ३ नोव्हेंबर, २०२०, १४ नोव्हेंबर, २०२०, २३ नोव्हेंबर, २०२०, २७ नोव्हेंबर, २०२०, २७ नोव्हेंबर, २०२०, २१ डिसेंबर, २०२०, २४ डिसेंबर, २०२०, २९ डिसेंबर, २०२०, १४ जानेवारी, २०२१, १९ जानेवारी, २०२१, २९ जानेवारी, २०२१, २४ फेब्रुवारी, २०२१, १५ मार्च, २०२१ आणि २७ मार्च, २०२१, ०४ एप्रिल २०२१, ०५ एप्रिल, २०२१, १३ एप्रिल, २०२१, १४ एप्रिल २०२१, १६ एप्रिल २०२१. १९ एप्रिल, २०१४, २० एप्रिल, २०२१, २१ एप्रिल, २०२१, २९ एप्रिल, २०२१, १२ मे, २०२१, ३० मे, २०२१, **०४ जुन, २०२१**, १० जुन २०२१, १७ जुन २०२१, **२५ जुन २०२१**, ०२ ऑगष्ट २०२१
**६) गृहमंत्रालय (एमएचए) आदेश क्रमांक.४०-३ / २०२०-पीएम-१(ए), दिनांक** १ मे, २०२०, ११ मे, २०२०, १७ मे, २०२०, २० मे २०२०, ३० मे२०२०, २९ जून, २०२०, २९ जुलै, २०२०, २९ ऑगस्ट, २०२०, ३० सप्टेंबर, २०२० व २७ ऑक्टोबर, २०२०, २५ नोव्हेंबर, २०२०, २८ डिसेंबर, २०२०, २७ जानेवारी, २०२१ आणि २३ फेब्रुवारी, २०२१, २८ मे, २०२१

**७) या कार्यालयाचे आदेश दिनांक** ११.०३.२०२०, १६.०३.२०२०, २०.०३.२०२०, २२.०३.२०२०, २३.०३.२०२०, २६.०३.२०२०, ०३.०४.२०२०, १३.०४.२०२०, १७.०४.२०२०, १९.०४.२०२०, २४.०४.२०२०, ०३.०५.२०२०, ०८.०५.२०२०, १८.०५.२०२०, ३१.०५.२०२०, २५.०६.२०२०, २६.०६.२०२०, २७.०६.२०२०, २९.०६.२०२०,०६.०७.२०२०, ३०.०७.२०२०, ३०.०९.२०२०, १४.१०.२०२०, २४.१०.२०, ३१.१०.२०, ०४.११.२०२०, १६.११.२०२०, १७.११.२०२०, २४.११.२०२०, २५.११.२०२०, ३०.११.२०२०, २२.१२.२०२०, १८.१२.२०२१, ३१.१२.२०२०, २९.०१.२०२१, २६.०२.२०२१, २.०३.२०२१, ०९.०३.२०२१, १६.०३.२०२१, ३०.०३.२०२१, ०४.०५.२१, ०५.०४.२१, ०६.०४.२१, ०७.०४.२१, १२.०४.२१, १४.०४.२०२१, १९.०४.२०२१, २०.०४.२०२१, २२.०४.२०२१, २९.०४.२०२१, ०५.०५.२०२१, १४.०५.२०२१, ३१.०५.२०२१, ०५.०६.२०२१, ११.०६.२०२१, १८.०६.२०२१, **२७.०६.२०२१**

# आदेश

## (कोविड-१९ साथरोगसंदर्भाने सुरक्षित महाराष्ट्र अंतर्गत नियमावली)

**ज्याअर्थी,** संदर्भिय अधिसूचना क्रमांक ३ अन्वये महाराष्ट्र राज्यात दिनांक १३.०३.२०२० पासून साथरोग अधिनियम १८९७ ची अंमलबजावणी सुरू झालेली आहे. या अधिनियमाअंतर्गत खंड २,३ व ४ नुसार प्रदान करण्यात आलेल्या अधिकारानूसार कोरोना विषाणू (कोविड-१९) या संसर्गजन्य रोगाचा प्रादुर्भाव होण्यास प्रतिबंध करणे याकरिता या कार्यालयाचे संदर्भिय ७ नुसार विविध आदेश निर्गमित करण्यात आलेले आहेत व सद्यस्थितीत सदर आदेशाच्या तरतूदी गडचिरोली जिल्ह्यात लागू आहेत.

**ज्याअर्थी**, उक्त संदर्भ क्रमांक ०५ चे शासन आदेशान्वये, महाराष्ट्र राज्यात कोविड-१९ साथरोगसंदर्भाने उचित प्रतिबंधात्मक उपाययोजनानंतर्गत नियमावली व उपाययोजना जिल्ह्यात लागू आहेत.

**ज्याअर्थी**, उक्त संदर्भ क्र. ५ चे दिनांक **०२.०८.२०२१** चे शासन आदेशातील तरतुदीच्या अनुषंगाने गडचिरोली जिल्हयातील नागरी, ग्रामीण तसेच औद्योगिक क्षेत्रातील जनतेस, खालील व्यक्ती, आस्थापना यांना उद्देशुन या कार्यालयाचे संदर्भ क्र.०७ वर नमुद यापूर्वी लागू असेलेले लॉकडाऊन संदर्भात सुधारित आदेश काढणे आवश्यक असल्याचे माझी खात्री झाली आहे.

**त्याअर्थी, मी दीपक सिंगला, जिल्हाधिकारी व जिल्हादंडाधिकारी तथा अध्यक्ष, जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण, गडचिरोली** वरील संदर्भ क्र. ५ मधील दिनांक ०२.०८.२०२१ चे शासन निर्देशाप्रमाणे कोविड - १९ साथरोग संदर्भाने तसेच फौजदारी प्रक्रिया संहिता १९७३ चे कलम १४४ उक्त आदेशानुसार वेळोवेळी सुरु केलेले व प्रतिबंधित बाबींना जिल्हा गडचिरोली सीमा क्षेत्रात जमावबंदी व टाळेबंदीसंदर्भात नियमावली आणि उपाययोजना कालावधी **०३ ऑगष्ट, २०२१ चे सकाळी ०७.०० वाजेपासून पुढील आदेशापर्यंत लागू करीत आहे.**

*शासन व जिल्हा प्रशासनाचे निर्देशाप्रमाणे वेळोवेळी निर्गमित केलेले आदेशातील सर्व निर्देश, सूचना, अटी व शर्तीचे पालन करणे सर्व संबंधितांना बंधनकारक असेल. कोविड-१९ साथरोगसंदर्भाने* **शासनाचे आदेश, जिल्हा प्रशासनाचे आदेशांमधील अटी, शर्ती, दंडाबाबत निर्देशाचे काटेकोर पालन करणे सर्व संबंधित व्यक्ती, आस्थापना व शासकीय-निमशासकीय विभागांना बंधनकारक असून खालील अतिरिक्त अटी व शर्तीचे पालन करणे सक्तीचे असेल.**

| अ. क्र. | बाबी | अनुज्ञेय बाबी/निर्देश |
|---|---|---|
| १ | **अत्यावश्यक सेवेत मोडणारी दुकाने** | अत्यावश्यक सेवेत मोडणाऱ्या दुकानांना सोमवार ते शुक्रवार चे सकाळी ७.०० ते रात्रौ ८.०० वाजेपर्यंत **सुरू** ठेवण्याची मुभा असेल. तर शनिवार ते रविवार ला सकाळी ७.०० ते दुपारी ३.०० वाजेपर्यंत **सुरू** ठेवण्याची मुभा असेल. |
| २ | **अत्यावश्यक सेवा वगळून इतर दुकाने** | सदर दुकानांना सोमवार ते शुक्रवार चे सकाळी ७.०० ते रात्रौ ८.०० वाजेपर्यंत **सुरू** ठेवण्याची मुभा असेल. तर शनिवारला सकाळी ७.०० ते दुपारी ३.०० वाजेपर्यंत **सुरू** ठेवण्याची मुभा असेल. तथापि रविवारला सदर दुकाने पूर्णत: **बंद** असतील. |
| ३ | **सार्वजनिक गार्डन, क्रीडांगण इ.** | सर्व सार्वजनिक बगीचे, क्रीडांगण हे व्यायाम, मॉर्निंग वॉक, सायकलिंग इत्यादी कारणाकरिता **सुरु** असेल. |
| ४ | **खाजगी/शासकीय कार्यालयातील उपस्थिती** | **१००%** उपस्थितीसह **सुरु** राहतील. |
| ५ | **कृषी विषयक सेवा/दुकाने** | सदर दुकानांना सोमवार ते रविवार चे सकाळी ७.०० ते रात्रौ ८.०० वाजेपर्यंत **सुरू** ठेवण्याची मुभा असेल. |
| ६ | **बांधकामसंबंधी कामे, उद्योग प्रक्रिया इत्यादी** | सदर कामे पूर्ण क्षमतेने **सुरू** ठेवण्याची मुभा असेल. |
| ७ | **सार्वजनिक वाहतूक व्यवस्था** | **१०० टक्के क्षमतेसह सुरु** ठेवता येणार **तथापि** सदर वाहनांमध्ये आसन व्यवस्थेव्यतिरिक्त उभ्याने प्रवासी नेण्यास मनाई असेल. |
| ८ | **व्यायामशाळा, सलून, ब्युटीपार्लर, स्पा, वेलनेस सेंटर्स इ.** | सदर दुकानांना सोमवार ते शुक्रवार चे सकाळी ७.०० ते रात्रौ ८.०० वाजेपर्यंत **सुरू** ठेवण्याची मुभा असेल. तर शनिवारला सकाळी ७.०० ते दुपारी ३.०० वाजेपर्यंत **सुरू** ठेवण्याची मुभा असेल. तथापि रविवारला सदर दुकाने पूर्णत: **बंद** असतील. सदर ठिकाणे **५० टक्के क्षमतेसह सुरू** ठेवण्याची मुभा असेल तथापि सदर ठिकाणांमध्ये एसी चा वापर करता येणार नाही. |
| ९ | **मॉल, सिनेमागृह/नाट्यगृह** | पुढील आदेशापर्यंत **बंद** असतील. |
| १० | **धार्मिक स्थळे** | पुढील आदेशापर्यंत **बंद** असतील. |

| | | |
|---|---|---|
| ११ | **शाळा/महाविद्यालये/कोचिंग क्लासेस** | शिक्षण विभाग तसेच उच्च तंत्रशिक्षण विभाग यांचे निर्देशानुसार लागू राहील. |
| १२ | **रेस्टॉरेन्ट, उपहारगृह** | सोमवार ते शुक्रवार चे सकाळी ७.०० ते दुपारी ४.०० वाजेपर्यंत ५०% डायनिंग क्षमतेसह **सुरू** ठेवण्याची मुभा असेल. तथापि पार्सल/होम डिलीव्हरी सुरु ठेवता येईल. |
| १३ | **संचारबंदी** | रात्री ९.०० ते सकाळी ५.०० वाजेपर्यंत वैध कारणाशिवाय बाहेर फिरण्यास मनाई असेल. |
| १४ | **वाढदिवस, सामाजिक, सांस्कृतिक, मनोरंजन, निवडणुका, निवडणुक प्रचार सभा, रॅली, निषेध कार्यक्रम इ. ठिकाणची गर्दीबाबत** | पुढील आदेशापर्यंत **मनाई** असेल. |
| १५ | **विवाह कार्यक्रम** | कोविड-१९ निर्देशाचे अधिन राहून सामाजिक अंतर राखून **एकूण ५० लोकांच्या मर्यादेत** कार्यक्रम पार पाडण्याची मुभा असेल. तथापि याचे उल्लंघन केल्यास रु. ५००००/- दंड व संबंधितांवर गुन्हा दाखल करण्यात येईल. |
| १६ | **अंत्यविधी** | कोविड-१९ निर्देशाचे अधिन राहून **एकूण २० लोकांच्या मर्यादेत** कार्यक्रम पार पाडण्याची मुभा असेल. |
| १७ | **ई-कॉमर्स 'साहित्य व सेवा'** | नियमितपणे सुरु असतील. |
| १८ | **कार्गो सेवा-वाहतूक** | नियमितपणे सुरु असतील. |
| १९ | **उत्पादनसेवा-MSME** | नियमितपणे सुरु असतील. |
| २० | **उत्पादन सेवा**<br>१. अत्यावशक सेवासंबंधी<br>२. प्रोसेसिंग सेवासंबंधी<br>३. राष्ट्रीय सुरक्षेसंबंधी<br>४. डाटा सेंटर्स/क्लाऊड सर्विस प्रोवायडर/क्रिटीकल इन्फ्रास्ट्रक्चर आणि सेवासंबंधी आयटी क्षेत्र | नियमितपणे सुरु असतील. |
| २१ | **आठवडी बाजार** | पुढील आदेशापर्यंत **बंद** असतील. |

१. **अत्यावश्यक सेवांमध्ये पुढील सेवांचा समावेश होतो:-**

1. रुग्णालये, रोगनिदान केंद्रे, चिकित्सालये, वैद्यकीय विमा कार्यालये, औषध विक्रेते, औषध निर्माण कंपन्या, इतर उत्पादन व वितरणासह वैद्यकीय व आरोग्य सेवा तसेच त्यांचे डीलर्स, वाहतूक व वितरण साखळी. कोविड साथरोग संबंधी लस, सॅनिटायझर, मास्क, वैद्यकीय साहित्ये, कच्चे उत्पादने/सेवा इ.
2. व्हेटरीनरी हॉस्पीटल्स/ॲनिमल केअर सेंटर्स व पेट फुड शॉप्स
3. वनविभागाने घोषित केलेले वनीकरणासंदर्भातील कामे
4. ऍवियेशन आणि संबंधी सेवा (एअरलाईन, विमानतळे, देखभाल, कार्गो, इंधन, सुरक्षा इ.)

5. किराणा मालाची दुकाने, भाजीपाल्याची दुकाने, फळविक्रेते, दूधपुरवठा केंद्रे (दुग्धशाळा), बेकरी, मिठाईची दुकाने व इतर सर्व प्रकारची खाद्यान्नदुकाने. (**परंतु पानटपरी/पानठेले, तंबाखुजन्य व्यवसाय सुरु ठेवता येणार नाही.**)
6. कोल्स्ड स्टोरेज व वेअरहाऊसिंग संबंधित सेवा
7. सार्वजनिक परिवहन- रेल्वेगाड्या, टॅक्सी, ऑटोरिक्षा व सार्वजनिक बस.
8. विविध देशांच्या राजदूतांच्या कार्यालयांच्या कामकाजाशी संबंधित असलेल्या सेवा.
9. स्थानिक प्राधिकरणांद्वारे केली जाणारी मान्सूनपूर्व (पावसाळापूर्व) कामे.
10. स्थानिक प्राधिकरणांद्वारे पुरविल्या जाणाऱ्या सर्व सार्वजनिक सेवा.
11. भारतीय रिझर्व बँकेने विनियमित केलेल्या संस्था
12. टेलिकॉम सेवाशी संबंधित देखभाल/दुरुस्तीची कामे
13. मालवाहतूक.
14. पाणी पुरवठाशी संबंधित कामे
15. कृषी संबंधित सेवा व बी-बियाणे, खते, साहित्ये, दुरुस्ती इ. दुकाने
16. साहित्यांचे निर्यात-आयात
17. ई- वाणिज्य (केवळ अत्यावश्यक साहित्यांचे पुरवठासंदर्भात)
18. अधिस्वीकृत प्रसारमाध्यमे.
19. पेट्रोलपंपआणिपेट्रोलियमशीसंबंधितअसलेलीउत्पादने
20. सर्व कार्गो सेवा
21. विदाकेंद्रे (डेटासेंटर्स)/क्लाऊड सेवा पुरवठादार / निर्णायक स्वरूपाच्या (क्रिटिकल) पायाभूत सुविधा व सेवा यांना सहाय्यभूत असणाऱ्या माहिती तंत्रज्ञान सेवा.
22. शासकीय व खाजगी सुरक्षा सेवा.
23. इलेक्ट्रिक व इंधन गॅस पुरवठा
24. बँकांची एटीएम्स
25. पोस्टल सेवा
26. सीमाशुल्क गृह अभिकर्ते/लसी / जीवरक्षकऔषधे/ औषध निर्मितीशी संबंधित उत्पादने यांची वाहतूक करण्यामध्ये सहयोगी असलेले लायसन्सधारक बहुप्रतिमानवाहतूक कार्यचालक.
27. अत्यावश्यक सेवामध्ये मोडणाऱ्या बाबींकरिता पॅकेजिंग करणारी उत्पादने.
28. पावसाळ्यात आवश्यक असणाऱ्या महत्त्वाच्या साधनसामुग्रीशी संबंधित उत्पादने.
29. आपले सरकार केंद्र/सीसीसी/सेतु केंद्र (**परंतु सदर ठिकाणी ५ पेक्षा अधिक लोक एकत्र येणार नाहीत याची दक्षता संबंधितांनी घेण्यात यावी.**)

२. **अतिरिक्त अपवादात्मक बाबी:-**

1. केंद्र, राज्य, स्थानिक प्राधिकरणाची कार्यालये
2. सार्वजनिक बँका, सार्वजनिक उपक्रम, सहकारी संस्था
3. अत्यावश्यक सेवासंबंधी कंपन्या
4. वीमा/मेडीक्लेम कंपनी
5. औषध उत्पादन/वितरणसंबंधी फार्मासिटयुकल कंपनी

6. आरबीआई तर्फे मान्यताप्राप्त सीसीआएल, एनपीसीआई, पेमेंट सिस्टीम इ.
7. नॉन बँकिंग फायनान्शियल कार्पोरेशन
8. सर्व सूक्ष्म वित्तपुरवठा संस्था
9. न्यायालये, लवादे, न्यायालयीन चौकशी कार्यालये

३. **संकीर्ण:-**

1. उक्त निर्देशांचे काटेकोर अंमलबजावणी करण्याची जबाबदारी ही संबंधित तालुक्यांचे **तहसिलदार** तथा इन्सिडंट कमांडटंट यांची असेल. त्यांनी संबंधित क्षेत्राचे मुख्याधिकारी- न.प./न.पं., पोलीस निरीक्षक यांचेसमवेत आवश्यक अंमलबजावणी करावी. तसेच गर्दीचे ठिकाणांवर, दुकानांमध्ये उक्त निर्देशांचे पालन होत आहे किंवा नाही याबाबत भरारी पथकांच्या माध्यमांतून उचित संनियंत्रण ठेवावे. जे व्यक्ती/आस्थापना/दुकाने कोविड-१९ साथरोगसंदर्भाने निर्देशांचे पालन करीत नसल्याचे निदशर्नास आल्यास त्यांचेवर नियमानुसार कारवाई करण्यात यावी.
2. संबंधित आदेशांचे योग्य अंमलबजावणी होत असल्याबाबत संनियंत्रयणाची जबाबदारी ही संबंधित क्षेत्राचे **उपविभागीय अधिकारी (राजस्व)** यांची असेल.
3. आरोग्य विभागाने कोविड-१९ लसीकरणासंदर्भाने व्यापक जनजागृती करावी व लवकरात लवकर **लसीकरण** उद्दिष्ट पूर्ण करण्याच्या दृष्टीने काटेकोर नियोजन करावे व आवश्यक उपाययोजना पूर्ण करावे तसेच कोविड-१९ चा प्रसार रोखण्यासाठी टेस्ट-ट्रेक-ट्रीट या त्रिसुत्रीचा व्यापक प्रमाणात वापर करावा.
4. सर्व संबंधित अधिकारी/कर्मचारी व विभागांनी आरटीपीसीआर तपासणींची संख्या वाढवावी.
5. महसूल/पोलीस/स्थानिक स्वराज्य संस्था यांनी कोविड-१९ साथरोगसंदर्भाने प्रशासनाने दिलेल्या निर्देशांचे पालन न करणाऱ्यांवर प्रभावीपणे दंडात्मक कारवाई करावी.
6. सर्व संबंधित यंत्रणांनी अत्यावश्यक साधने व सुविधा यांची साठेबाजी व काळाबाजार करणाऱ्यांविरुद्ध नियमाप्रमाणे कठोर कारवाई करावी.

**सदरील आदेशाचे पालन न करणारी/ उल्लंघन करणारी कोणतीही व्यक्ती, संस्था अथवा समुह यांनी साथरोग प्रतिबंधक कायदा १८९७, आपत्ती व्यवस्थापन अधिनियम २००५ तसेच भारतीय दंड संहिता १८६० नुसार शिक्षेस पात्र असलेला अपराध केला असे मानण्यात येईल व नियमानुसार कारवाई करण्यात येईल.**

सदरचे आदेश आज दिनांक **०३/०८/२०२१** रोजी माझे सही व शिक्क्यानिशी निर्गमित करण्यात येत असून सदर आदेश गडचिरोली जिल्हा सीमा क्षेत्रात दिनांक **०३/०८/२०२१ चे सकाळी ७ ते पुढील आदेशापर्यंत लागू** असेल.

Office of the District ...

**जिल्हाधिकारी व जिल्हादंडाधिकारी तथा अध्यक्ष,**
**जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण, गडचिरोली**